**पुणे महानगरपालिका**

**महिला व बाल कल्याण समिती**

**कार्यपत्रिका क्र. २२**

**महिला व बाल कल्याण समितीची पाक्षिक सभा बुधवार,दिनांक २३/०१/२०१९ रोजी दुपारी ३=३० (साडे तीन ) वाजता महात्मा ज्योतिबा फुले सभागृह (स्थायी समिती सभागृहात) भरेल. सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.**

**विषय.क्र १२७**

मा. हमिदा सुडंके ,मा. अब्दुल गफुर पठाण आणी परविन फिरोज शेख यांचे दि.१०/०१/२०१९ चे पत्र.

प्रभाग क्र २७ कोंढवा मिठानगर मध्ये पुणे महानगरपालिकेची मराठी,उर्दु व इंग्रजी माध्यमाची प्राथमिक शाळा असून माध्यमिक शाळा नसल्यामुळे विद्यार्थ्यांना खाजगी शाळेत पुढील शिक्षण ध्यावे लागते.काही विद्यार्थी आर्थिक परिस्थितीमुळे शिक्षण सोडून देतात .प्रभागातील शाळांमध्ये पुणे शहरातील मनपा शाळांमधील जादा विद्यार्थी संख्या आहे.यामुळे प्रभागात माध्यमिक(९वी व १० वी वर्ग) व उच्च माध्यमिक(११ वी व १२ वी वर्ग)मराठी,उर्दु व इंग्रजी माध्यमाची शाळा सुरु करणे अत्यावश्यक आहे.नवीन शैक्षणिक वर्ष जून २०१९ पासून प्रभाग क्र.२७ कोंढवा मिठानगर मध्ये माध्यमिक(९ वी व १० वी)मराठी ,उर्दु व इंग्रजी शाळा सुरु करण्यात यावी.

**विषय.क्र १२८**

मा. सौ. अनिता संतोष कदम यांचे दि.११ /०१/२०१९ चे पत्र

प्रभाग क्र.३० क मधील जीर्ण झालेली सार्वजनिक शौचालय पाडून नवीन बांधण्याबाबत.

माझ्या भागामध्ये पानमळा ,जनता वसाहत,दांडेकरपूल,गणेशमळा इत्यादी भाग हा झोपडपट्टीरहीत असल्यामुळे तेथील नागरिक सार्वजनिक शौचालयचा वापर हा मोठ्या प्रमाणात करत असतात .परंतु या भागातील काही शौचालय ही अतिशय जीर्ण अवस्थेत झालेली आहेत या ठिकाणे शौचालय दुरुस्तीची निविदा लाऊन सुद्धा काम करणे शक्य होत नाही. अंदाजे २० ते २५ वर्षापूर्वीची ही शौचालय असावीत.पूर्वीच्या पध्दतीने केलेल्या बांधकामामुळे त्या ठिकाणी काम करणे शक्य होत नाही तसेच हि शौचालये पाडून नवीन बांधण्यात आली नाही.तर त्या ठिकाणी भविष्यात अपघात होण्याची दाट शक्यता भासते तरी पुढील येणा-या सन २०१९-२० च्या अंदाज पत्रकामध्ये माझ्या यादीमधून या शौचालयाकरिता बजेट उपलब्ध करुन देणार आहे तरी आपल्या मार्फत जुनी शौचालय पाडून त्या ठिकाणी अत्याधुनिक नवीन शौचालय बांधण्याची मान्यता मिळावी..१)पानमळा वसाहत २)गल्ली नं१६ समोर जनता वसाहत ३) गणेश मळा अजिंक्य मित्र मंडाळाजवळ ४)राममंदिर परिसर जनता वसाहत(खाण) ५) जय भवानी नगर( अग्निशमक केंद्रा शेजारी)

**विषय.क्र १२९**

मा. सौ. संगीता राजेंद्र ठोसर यांचे दि. १६/०१/२०१९ चे पत्र

पुणे महानगरपालिकेने प्रभाग क्र.४१ कोंढवा बु.स.नं २ येथील जागेत भाजी मंडईचे बांधकाम केले असून पहिल्या मजल्यावरील विविध हॉलच्या जागेत हॉकर्स पूर्नवसन अंतर्गत हॉकर्स विक्रेत्यांच्या प्रशिक्षणाबरोबरच समाजातील सर्व स्तारातील घटकांना जसे की अंपग(सर्व प्रकार)परित्यकत्या ,विधवा,बेरोजगार,युवक,युवती, बरोबरच तंत्रज्ञान मागासवर्गीय महिला, अल्पसंख्यांक इत्यादींना पारंपारिक प्रशिक्षण बरोबरच आधुनिक व्यवसाय/कौशल्य प्रशिक्षण/स्पर्धा परिक्षा/इंडस्ट्री /मार्केट या बाबतचे प्रशिक्षण देण्यासाठी समाज प्रशिक्षण संस्था सुरु करावी.

याकरिता मनपाच्या सन २०१८-१९ च्या बजेट मधील मान्य योजनांतून उपलब्ध निधी खर्च करण्यात यावा. याकरीता योजना, प्रशिक्षण कार्यक्रम ठरविणे,त्यांस शासन मान्यता घेणे, या करिता प्रस्ताव देणे, फर्निचरसह तदनुषंगिक बाबी खरेदी करणे,पुरविणे ,बसविणे, आऊट सोर्सिंगने प्रशिक्षक घेणे,लाभार्थी ठरविणे, प्रशिक्षण मानधन ठरविणे, आवश्यक प्रशासकीय स्टाफ आऊट सोर्सिंगने घेणे, बॅाड बँड कनेक्टिव्हिटी घेणे,शासन मान्य/इतर खाजगी व अभ्याक्रम ठरविणे, वृत्तपत्रामध्ये जाहिरात देवून एक्सप्रेशन ऑफ इंटरेस्ट द्वारे संस्थेची निवड करणे,मनपा स्तारावरील सर्व प्रशिक्षण संस्थामध्ये शासन मान्य अभ्यासक्रम/खाजगी व इतर बाजारात सध्या सर्वधिक मागणी असलेले कोर्सेस, योजना तयार करणे,राबविणे ,या सह हॉकर्स पुर्नवसन अंतर्गत व समाजातील सर्व घटकांच्या प्रशिक्षण कार्यक्रमासाठी लागणारी पुस्तके/ग्रंथ यामध्ये व्यावसायिक सामाजिक,आर्थिक ,व्यापार ,कला,शिक्षण ,अभ्यासक्रम,साहित्य,बाल साहित्य ,कथा ,कादंब-या,कविता ,ललित ,शैक्षणिक,माहिती तंत्रज्ञान,इंडस्ट्री .पुस्तके तसेच महाराष्ट्र शासनाच्या ग्रंथालय समिती अथवा शासन मान्य ग्रंथ सुची बरोबर वाचकांना सर्वाधिक पसंती/प्रसिध्दी व पुरस्कार लाभलेली पुस्तके खरेदी करणे करिता योजना तयार करणे,राबविणे, आवश्यकता नुसार त्यामध्ये बदल करणे, अभ्यासक्रमाची फी,लाभार्थ्यांना प्रशिक्षण करिता

**<u>विषय.क्र १२९ पुढे चालू...</u>**

अनुदान ,इतर खर्च निश्चित करणे,त्यामध्ये आवश्यकतेनुसार वेळोवेळी वाढ करणे,ही योजना तयार करणे व राबविणेचे सर्वधिकार मा.महापालिका आयुक्त अथवा त्यांनी निश्चित केलेले मा.उप- आयुक्त ,समाज विकास विभाग देण्यास मान्यता द्यावी.

**<u>विषय.क्र १३०</u>**

मा. सौ. पूजा कोद्रे यांचे दि. १७/०१/२०१९ चे पत्र

पुणे महानगरपालिकेत कार्यरत आरोग्य निरिक्षक या पदावरील कर्मचा-यांना सेवाप्रवेश व सेवांचे वर्गीकरण नियम २०१४ मध्ये नमूद केलेली शैक्षणिक अर्हता प्राप्त नसलेने त्यांना वरीष्ठ आरोगय निरीक्षक या पदावरुन आरोग्य निरीक्षक या पदावर पदावन्नत करण्याचा विचार पुणे महानगरपालिका प्रशासन करीत आहे.

मे.मुंबई येथील उच्च न्यायालयात मान्यताप्राप्त युनियनने रिट पिटीशन क्र.२९७२/२०१५ मध्ये रिक्रुटमेंट रुल्स व ग्रेड पे बाबतचे म्हणणे दाखल केले असून सदरचे रिट पिटीशन मे.मुंबई उच्च न्यायालयात प्रलंबित आहे. अशा परिस्थित एकतर्फी निर्णय घेऊन कर्मचा-यांवर अन्याय करणे प्रशासकीय दुष्ट्या योग्य नाही.

तरी वरील बाबीचा विचार करुन वरिष्ठ आरोग्य निरीक्षक या पदांवर कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांना आरोग्य निरीक्षक या पदावर पदावन्नत येऊ नये.

**<u>विषय क्र.१३१</u>**

सांस्कृतिक भवन व नागरवस्ती प्रशिक्षण केंद्र बांधकामाबाबत.मा.युवराज बेलदरे यांचे दि.१२/९/१७ च्या पत्रावर झालेला मा.महिला व बाल कल्याण समिती ठराव क्र.१३३,दि.२५/१०/२०१७ ला अनुसरुन मा.अति.महा.आयुक्त (ज) यांचे जा.क्र.मआ/भवन/१०५९,दि.१०/१/२०१९ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी.

**<u>विषय क्र.१३२</u>**

नागरी दलित वस्ती सुधारणा योजनेतंर्गत सन २०१८-१९ मधील र.रु.३० लाख पर्यंतची कामे करणेस मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचेकडील जा.क्र.मआ /समाज कल्याण/११०५,दि.१५/१/२०१९ चे पत्र.

**<u>विषय क्र.१३३</u>**

प्रभाग क्र.७ ड मधील जुने स्वच्छतागृह पाडणेबाबत.मा.सौ.रेश्मा भोसले यांचे दि.१४/११/१८ च्या पत्रावर झालेला मा.महिला व बाल कल्याण समिती ठराव क्र.११२,दि.२८/११/२०१७ ला अनुसरुन मा.अति.महा.आयुक्त (वि) यांचे जा.क्र.मआ/प.क्र.२/११३९ दि.१७/१/२०१९ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी.

**<u>विषय क्र. १३४</u>**

शहरी गरीब वैद्यकीय सहाय्य योजने अंतर्गत दंतवैद्यकीय सुविधेबाबत मा.सौ.अर्चना पाटील व सौ.रुपाली धाडवे यांचे दि.९/५/२०१८ च्या पत्रावर झालेला महिला व बाल कल्याण समिती सभा ठराव क्र.२०,दिनांक २३/५/२०१८ ला अनुसरून मा.महा.आयुक्त यांनी जा.क्र.मआ/आरोग्य/६३६, दिनांक २६/१०/२०१८ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी .

(टिप-सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे मागील सभेत ठरले होते)

नगरसचिव
पुणे महानगरपालिका